# कात्रज घाटातील काम

खेड-शिवापूर, दि. १६ (वार्ताहर) : गेले साडेतीन महिने दुरुस्तीसाठी वाहतुकीस बंद केलेला कात्रज बोगदा बुधवारी (ता. १५) सुरू करण्यात आला. मात्र, अपूर्ण काम पूर्ण करण्याकडे संबंधित खात्याने दुर्लक्ष केल्याचेच दिसून येते.

१ जानेवारी ते १५ एप्रिल या कालावधीत कात्रज बोगद्यातील रस्ता करण्यासाठी येथील वाहतूक बंद ठेवली होती. ३१ मार्चपर्यंत काम पूर्ण न झाल्याने १४ एप्रिलला बोगद्यातील रस्त्याचे सिमेंट काँक्रिटचे काम पूर्ण झाल्यानंतर बुधवारी (ता. १५) पहाटेपासून बोगद्यातील व कात्रज घाटातील अडथळे बाजूला करून बोगदा वाहतुकीस खुला करण्यात आला आहे. बोगद्यातील दोन्ही बाजूचे गटार आर.सी.सी. करण्यात आले आहेत. प्रत्येक अडीच मीटर अंतरावर चेंबर करण्यात आले आहे. त्यावर आर.सी.सी. झाकण बसविण्यात आले असून, बोगद्यातील रस्त्याच्या दोन्ही बाजूंना व मध्यवर्ती लालरंगाचे रिफ्लेक्टर, कॅटसाइझ बसविण्यात आले आहेत. बोगद्याच्या सातारा व पुण्याकडील बाजूंना गटारांची कामे करण्यात आली असून, गटारांची रस्त्याकडील बाजू मोठ्या खडीने भरण्यात आली आहे. त्यावर डांबरीकरण अद्यापही करण्यात आलेले नाही. या दरम्यानच्या कालावधीत कात्रज घाटातील कठड्यांची कामे करण्यात आली असून, काही ठिकाणी कठड्यांची कामे व घाटरस्त्यावरील मोरीच्या कठड्यांची कामे करण्यात आली नाहीत. पावसाळी गटारांची कामे करणे गरजेचे आहे. तरीसुद्धा कात्रज बोगद्याच्या साताऱ्याकडील बाजूस व पुण्याकडील बाजूस ८२८/३०० ते ८३२/१९० या किलोमीटरमध्ये डांबरमिश्रित बारीक खडीचा थर टाकण्यात आला नसून पावसाळ्यापूर्वी डांबरीकरणाचे काम करण्यात यावे, अशी मागणी प्रवाशांकडून करण्यात येत आहे.

## पुन्हा एकेरी वाहतूक

पावसाळ्यात घाटरस्त्यावरील बारीक खडीचे डांबरीकरणाचे काम सुरू होणार आहे. या कालावधीत काम पूर्ण होईपर्यंत या घाटरस्त्याने एकेरी वाहतूक ठेवण्यात येणार आहे. प्रवाशांना पुन्हा एकेरी वाहतुकीस सामोरे जावे लागणार आहे.

## मंदिराकडे जाणाऱ्या पायऱ्या काढल्या

बोगद्याजवळ वाघजाई मंदिराकडे व बी.एस.एन.एल.च्या डीपीकडे जाण्यासाठी पूर्वीपासून दिसणाऱ्या पायऱ्या गटाराच्या कामात काढण्यात आल्या आहेत. स्थानिक नागरिकांनी संबंधित ठेकेदाराकडे मागणी करूनही गटारावर झाकण व पायऱ्या केल्या नसल्याने वाघजाईमातेच्या मंदिराकडे जाणाऱ्या भाविकांची व बी.एस.एन.एल.च्या कर्मचाऱ्यांची गैरसोय होणार आहे.

साडेतीन



■ कात्रज बोगद्याच्या बाहेरील घाट रस्त्या

This PDF file is Created by trial version of 123 PDF Creator.
Please use purchased version to remove this message.